# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील सर्वच विद्यापीठातील अध्यापकांच्या पदोन्नती व वेतनवाढीकरिता शिफारस करणारी प्रकरणे रखडल्याबाबत**

**(१) १७ (२२-१२-२०१४). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वच विद्यापीठातील अध्यापकांच्या पदोन्नती व वेतनवाढीकरिता शिफारस करणारी प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अध्यापकांच्या पदोन्नतीचे प्रकरण मार्गी लावण्यासाठी शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-०७-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) संबंधित विद्यापीठास त्रुटींच्या पुर्ततेबाबत पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. त्रुटींच्या पूर्ततेच्या अनुषंगाने संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावर कार्यवाही चालू आहे.

---

**मुंबईतील बेस्टच्या बसगाड्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे**
**चित्रीकरण साठवण्याची व्यवस्था नसल्याबाबत**

**(२) १८ (२३-१२-२०१४). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बेस्टच्या बसगाड्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे चित्रीकरण साठवण्याची व्यवस्था असलेल्या बसगाड्यांमध्ये अनेक कॅमेरे बंद व निकामी असल्याचे एका महिलेने केलेल्या तक्रारीवरुन धक्कादायक बाब माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार सदर घटनेबाबत दुर्लक्ष व बेजबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच महिला सुरक्षतेसाठी कटिबध्द असलेल्या बेस्ट प्रशासनाने बसगाड्यांतील त्रुटी समजून घेऊन बेस्टच्या बसगाड्यांतील सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :** (१) माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये बसमार्ग क्रमांक ६७ मध्ये एका महिला प्रवाशाबरोबर गैरवर्तन झालेल्या संबंधित बसगाडीमधील सी.सी.टी.व्ही. कॅमेरा सिस्टम नादुरुस्त असल्याचे निदर्शनास आले होते.

(२) होय.

(३) व (४) सदर प्रकरणाच्या चौकशीत कॅमेरा सिस्टीम नादुरुस्त असल्याचे निदर्शनास आले. बेस्ट बसगाड्यांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे व त्यांच्या देखभालीची कामे कॅमेरे बसविणे व त्याच्या देखभालीची कामे मेसर्स व्हर्व कॉम्प्युसॉफ्ट प्रा.लि. या खाजगी कंत्राटदारास बेस्ट प्रशासनामार्फत देण्यात आलेली आहे. सदर कंपनी बेस्ट बसगाड्यांमधील सी.सी.टी.व्ही. सिस्टीम स्वखर्चाने बसवित असून त्याची देखभाल सुध्दा करीत आहे. याकरिता बेस्ट उपक्रमाने सदर कंपनीस कोणतीही रक्कम अदा केलेली नाही. त्या बदल्यात सदर कंपनीला बसगाड्यामध्ये दोन एलसीडी स्क्रीनची मांडणी करुन त्यावर जाहिरातीचे हक्क देण्यात आलेले आहेत.

बेस्ट बसगाड्यांमश्ये सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्यचे काम टप्प्याटप्प्याने करण्यात येत असून उर्वरित बसगाड्यांमध्ये सी.सी.टी.व्ही. सिस्टीम बसविण्याचे काम मार्च, २०१५ पर्यंत पुणै करण्याचे निर्देश संबंधित कंपनीस बेस्ट प्रशासनामार्फत देण्यात आले आहेत. तसेच नादुरुस्त असलेले सीसीटीव्ही तातडीने दुरुस्त करण्याचे आदेश सुध्द त्यांना देण्यात आले आहेत.

सी.सी.टी.व्ही. आणि कॅमेरे ही यंत्रणा नवीन असल्यंमुळे साधनसामुग्रीची अनुपलब्धता आणि अन्या तांत्रिक बाबींमुळे यं यंत्रणेची अंमबजावणी पूर्ण होण्यास विलंब होत आहे. तसेच यंत्रणेत निर्माण होणारे बिघाड दुरुस्त करण्यास देखील विलंब होत आहे. सदर काम अपेक्षित गतीने होत असून याबाबत सदर कंपनीला नोटीस बजावण्यात आलेली आहे. तसेच हे काम

जलदगतीने होण्याकरिता आणि यंत्रणेतील बिघाड दुरुस्तीकरिता देखील सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. परिणामस्वरुप या यंत्रणेतील कामकाजास गती येत असून जानेवारी २०१५ मध्ये २९४५ बसगाड्यांवर असलेली ही यंत्रणा सद्य:स्थितीत ३४७४ बसगाड्यांवर बसविण्यात आलेली आहे.

उपरोक्त वस्तुसिथती विचारात घेता, बेस्ट उपक्रामाच्या अधिका-यांनी सातत्याने पाठपुरावा केल आहे. सबब बेस्ट अधिका-यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवला नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील गिरण्या प्रकल्पामधील सन १९७६ पुर्वीच्या पुनर्वसित गावठाणांमध्ये पुरवायच्या नागरी सुविधांबाबत**

**(३) १३६०७ (०७-०४-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील गिरण्या प्रकल्पामधील सन १९७६ पुर्वीच्या पुनर्वसित गावठाणांमध्ये पुरवायच्या नागरी सुविधांबाबत दिनांक ३१ जुलै, २०१४ रोजी नाशिक विभागीय आयुक्तालयाने शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी अंदाजपत्रके पाठवूनही सदर प्रस्ताव माहे जानेवारी २०१५ पर्यंत शासनाकडे प्रलंबित असल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुनर्वसित गावांना नागरी सुविधा पुरविणे आवश्यक असल्यामुळे उक्त अंदाजपत्रकांना प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर २०१४ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (२७-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सन १९७६ पूर्वीच्या प्रकल्पातील पुनर्वसित गावांना नागरी सुविधा पुरविणे या योजनेअंतर्गत सद्य:स्थितीत पुरेसा निधी उपलब्ध नसल्यामुळे, नाशिक जिल्ह्यातील गिरणा प्रकल्पातील पुनर्वसित गावांना नागरी सुविधा पुरविण्याच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही. यासंदर्भात नियोजन विभागाच्या सूचनांनुसार सदर मूल्यमापन समितीमार्फत आढावा घेण्यात येत असून मूल्यमापन समितीच्या मान्यतेनंतर सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे**
**प्राचार्य व कर्मचाऱ्यांच्या मागण्याबाबत**

**(४) १३६१२ (०८-०४-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे प्राचार्य व कर्मचारी संघटनांनी दिनांक ८ डिसेंबर, २०१४ पासून बेमुदत साखळी उपोषणाचे आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संघटनांच्या सर्वसाधारण मागण्या काय आहेत,

(३) असल्यास, उक्त मागण्यांच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यातील खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना वेतन व वेतनेत्तर अनुदान देण्याची मागणी संघटनेने शासनास केलेली आहे.

(३) अनुदान देता येणार नाही असा निर्णय शासनस्तरावर घेण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील नांदगावसह ५६ खेडे प्रादेशिक**
**नळपाणीपुरवठा योजनेचे नुतनीकरण करण्याबाबत**

**(५) १३६२६ (०७-०४-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील नांदगावसह ५६ खेडे प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजनेचे नुतनीकरण करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना कालबाह्य झाल्यामुळे या योजनेचे नुतनीकरण करण्यासाठी नाशिक जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये माहे डिसेंबर, २०१० मध्ये ठराव करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणी व ठरावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२६-०५-२०१५) :** (१) होय, खरे आहे.
(२) व (३) होय, खरे आहे.

उक्त मागणी व ठरावाच्या अनुषंगाने सदर योजना सन २०१५-१६ च्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांच्या कृती आराखड्यात समावेश करण्यात आला आहे. याशिवाय समाविष्ट गावांच्या ग्रामसभेचे/ग्रामपंचायतीचे योजना स्विकृतीबाबत ठराव प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात अनेक कुटुंबाचे योग्य सर्वेक्षण न झाल्याने त्यांना दारिद्रय रेषेखालील पिवळ्या शिधा पत्रिकेपासून वंचीत राहावे लागल्याबाबत**

**(६) १३६५५ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक कुटुंबाचे योग्य सर्वेक्षण न झाल्याने त्यांना दारिद्रय रेषेखालील पिवळ्या शिधा पत्रिकेपासून वंचीत राहावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, योग्य सर्वेक्षण न झाल्यामुळे वंचित असलेल्या कुटुंबांना पिवळ्या शिधापत्रिका देण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१६-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) राज्यातील दारिद्रयरेषेखालील कुटूंबे निश्चित करण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यात सामाजिक, आर्थिक व जातनिहाय सर्वेक्षण, २०११ ची कार्यवाही शासनाच्या ग्रामविकास व जलसंधारण विभागामार्फत स्वतंत्रपणे करण्यात येत आहे. त्यानुसार सदर प्रक्रियेतील सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून प्रारुप यादी प्रसिध्द करणे, दावे वा आक्षेप निकालात काढणे इ.प्रक्रिया सुरु आहे. सदर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्वेक्षणाची परिपूर्ण माहिती केंद्र शासनास सादर करण्यात येऊन प्राप्त निकषानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील जिल्हा परिषद कार्यालयाच्या माध्यमातून कार्य करणा-या समाजकल्याण अपंग विभागामधील कर्मचारी व अधिकारी हे कार्यालयात हजार राहत नसल्याबाबत

**(७) १३६६४ (०८-०४-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील जिल्हा परिषद कार्यालयाच्या माध्यमातून कार्य करणा-या समाजकल्याण अपंग विभागामधील कर्मचारी व अधिकारी हे कार्यालयात हजर राहत नसल्याने लाभधारकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या वतीने अपंग नागरिकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत परंतु या योजनांचा संबंधित लाभधारकांना रितसर लाभ होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०५-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई परिक्षेत्राती मुंबई उपनगर, ठाणे, नाशिक, रायगड, पालघर या जिल्ह्यातील महावितरण कंपनीची वीज चोरी वाढल्याबाबत

**(८) १३६७७ (०४-०४-२०१५). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई परिक्षेत्राती मुंबई उपनगर, ठाणे, नाशिक, रायगड, पालघर या जिल्ह्यातील महावितरण कंपनीची वीज चोरीचे प्रमाण वाढल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत किती वीज चोरीची प्रकरणे पकडली आहेत व त्यांचेवर कोणती कारवाई केली व करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्यांचेकडून आतापर्यंत किती रुपयांची दंड वसूल करण्यात आला आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :** (१) नाही.

(२) मुंबई उपनगर, ठाणे, नाशिक, रायगड, पालघर या जिल्ह्यात सन २०१४-१५ मध्ये एकूण ८६७३ ग्राहकांची वीज चोरी पकडण्यात आली असून त्यांना रु.९३८.८२ लाखाची वीज चोरीची

देयके देण्यात आली आहेत. विजचोरी करणाऱ्या ग्राहकांवर विद्युत कायदा २००३ कलम १२६/१३५ अंतर्गत कार्यवाही करण्यात येते.

(३) वीजचोरीच्या देयकापोटी रु.४३२.९४ लाखाचा दंड वसूल करण्यात आला आहे.

---

**राज्याच्या अर्थसंकल्पात शिक्षणासाठी भरीव तरतूद करण्याबाबत**

**(९) १३६८१ (०९-०४-२०१५). श्री.भिमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) युनेस्कोच्या शिक्षणविषयक मार्गदर्शक तत्त्वानुसार प्रत्येक देशाने आपल्या राष्ट्रीय अंदाजपत्रकात शिक्षणावर ६ टक्के खर्च करणे अपेक्षित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र व राज्य शासनाने अर्थसंकल्पात अद्यापपर्यंत ४ ते ४.५ टक्क्याच्या वर तरतूद केलेली नसून राज्याच्या अर्थसंकल्पात करण्यात येत असलेल्या तरतूदींमधील निम्म्याहून अधिक खर्च उच्च शिक्षणावर केला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात मुलभूत असलेल्या प्रारंभिक शिक्षणाकरीता अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०५-२०१५) :** (१), (२), (३) व (४) राष्ट्रीय शैक्षणकि धोरणाप्रमाणे स्थूल उत्पन्नाच्या (GDP) ६% खर्च शिक्षणावर होणे अपेक्षित आहे. सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार शालेय शिक्षण विभागाचा खर्च राज्याच्या एकूण स्थूल उत्पन्नाच्या (GDP) २.६४% इतका आहे तर चालू किंमतीवर आधारित राज्य उत्पन्नाच्या २.९२% इतका आहे. सन २०१५-२०१६ या वर्षात राज्याच्या एकूण अर्थसंकल्पाच्या शालेय शिक्षणावरील खर्च १७.३५% इतका आहे.

---

**राज्यात ग्राहक कल्याण सल्लागार समिती फेरगठीत करण्याबाबत**

**(१०) १३६९५ (०७-०४-२०१५). श्री.भिमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्राहक चळवळीला प्रोत्साहन देऊन ती ग्रामीण भागात पोहचविण्यासाठी शासनास विविध उपाययोजना आखण्याबाबत सल्ला देण्यासाठी नेमलेली ग्राहक कल्याण सल्लागार समिती शासनाने बरखास्त केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समिती फेरगठीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२०-०४-२०१५) :** (१), (२) व (३) ग्राहक चळवळीला प्रोत्साहन देण्याचे व ही चळवळ ग्रामीण भागात पसरविण्यासाठी, त्यासाठी करावयाच्या उपाययोजना व समितीकडून शासनास अपेक्षित असलेली कामे न केल्यामुळे राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समिती बरखास्त करण्याचा निर्णय दिनांक २४ डिसेंबर,२०१४ रोजी घेण्यात आला आहे. सदय:स्थितीत समितीचे फेरगठन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

---

**जिल्हा यवतमाळ येथील पारवा वन विभाग क्षेत्रातील**
**जांब येथील अवैध वृक्षतोड**

**(११) १३७१५ (०८-०४-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा यवतमाळ येथील पारवा वन विभाग परिक्षेत्रातील जांब या गावात झामाबाइ तोडसाम या आदिवासी महिलेचे ५ एकर शेत असून सन २०११ मध्ये त्यांचे पती श्री.गणपत तोडसाम यांनी वन विभागाच्या परवानगीने शेतातील सागवान झाडांची तोड केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागाने शेतातील तोडलेली सागवान झाडे अवैध वृक्षतोड म्हणून उमरी वखारात जमा केली असून त्या झाडांची किंमत ५ लाख ११ हजार रु. असून सदर रक्कम पती यांच्या नावाने वन विभागाकडे जमा आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आपल्या सागवानाची रक्कम मिळावी म्हणून त्यांचे पती यांनी रक्कम करीता वारंवार अडचणीमुळे उपचाराअभावी मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आपल्या हक्काची सदर रक्कम त्वरीत मिळण्याबाबत व न मिळाल्यास आपल्या मुली सह समाधी घेवून जिवनयात्रा संपविण्याबाबत ची सुचना श्रीमती झामाबाई तोडसाम यांचेकडून जिल्हाधिकारी यांचेकडे प्राप्त झाली, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे व कसे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) श्रीमती झामाबाई तोडसाम यांचे पती श्री.तोडसाम यांनी सन २००९ मध्ये स्वत:च्या गट नं.९९ मधील साग वृक्षांची विना परवाना तोड केलेल्या १८० साग वृक्षापैकी ६० वृक्ष गाव नकाशानुसार गट क्रमांक ९९ च्या सीमेतील होते आणि १२० वृक्ष लगतच्या ई-वर्ग शासकीय जमिनीतील असल्याचे तपासात स्पष्ट झाले. श्रीमती झामाबाई तोडसाम यांच्या स्वत:च्या गट नं.९९ मोजा जांब मधील ६० झाडापासूनचा १०.९८० घ.मी.माल. होता. त्या मालाची किंमत रु.१,७०,३३३/- होती. श्रीमती तोडसाम यांना यापूर्वी दिलेल्या अग्रीम वखार खर्च वजा करुन रु.१,१३,९१० रक्कम दिनांक ६.१.२०१५ रोजी देण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) श्रीमती झामाबाई तोडसाम यांनी आपल्या मुलीसह समाधी घेऊन जीवनयात्रा संपविण्याबाबत निवेदन प्राप्त झालेले नाही. तथापि, त्यांना लाकडाचे पैसे मिळण्याबाबतचे जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडून दिनांक १.११.२०१४ रोजी प्राप्त झाले आहे. त्यानुसार श्रीमती तोडसाम यांना रु.१,१३,९१० रक्कम दिनांक ६.१.२०१५ रोजी देण्यात आली आहे.

---

**यवतमाळ जिल्ह्यातील शासनाच्या स्वस्त धान्य दुकानातील माल थेट काळ्याबाजारात विक्री होत असल्याबाबत**

**(१२) १३७१८ (०७-०४-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील पुसद, उमरखेड, महागांव या तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानातील धान्य दुकानदार बीपीएल, एपीएल व केशरी कार्ड धारक, अन्न सुरक्षा कार्ड धारकांना मालाचे वाटप करुन उर्वरीत कार्ड धारकांचा माल थेट काळ्याबाजारात विक्री होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील जवळपास तीनशे दुकानदारांकडे भाड्याने घेतलेला परवाना असून स्वतःच्या परवान्यावरील धान्याची कमी उचल व भाड्याने असलेल्या परवान्याच्या धान्याची उचल जास्त प्रमाणात होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुसद तालुक्यातील काही निलंबित परवाने इतरत्र दुकानास जोडले असून त्या दुकानांचे अंतर २० ते २५ कि.मी. आहे, त्यातील एकाही परवाना धारकाने लाभार्थ्यांना धान्य वाटप केलेले नसून काळ्या बाजारात विक्री केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (११-०५-२०१५) :** (१) या आशयाच्या बातम्या वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्या आहेत. त्या अनुषंगाने तपास केला असता, बातमीत तथ्य आढळून आले नाही.

(२) यवतमाळ जिल्ह्यात कोणत्याही दुकानदारांकडे भाड्याने घेतलेला परवाना नाही, त्यामुळे धान्याची उचल कमी जास्त प्रमाणात होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) पुसद तालुक्यात निलंबित केलेली ३२ रास्तभाव दुकाने जवळच्या रास्तभाव दुकानांना जोडण्यात आली आहेत. यापैकी मौजे हिळवणी (पालमोड) येथील एकच रास्तभाव दुकान, तेथील जवळचे रास्तभाव दुकानदार घेण्यास तयार नसल्याने, २० कि.मी. अंतरावर पुसद येथील रास्तभाव दुकानास जोडण्यात आले आहे. सदर रास्तभाव दुकानातील दुकानदार हिवळणी येथील कार्डधारकांना दरमहा नियमानुसार धान्याचे वाटप करीत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ तालुकातील पांढुर्णा, पिंप्री येथील अंगणवाडीतील**
**मुलांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(१३) १३७२० (०८-०४-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ तालुक्यातील पांढुर्णा, पिंप्री येथील अंगणवाडीमध्ये विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची सोयी सुविधा मिळत नसल्यामुळे स्थानिक ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिका-यांना निवेदन देऊन संबंधित सुपर वायझर, सेविका व मदतनिस यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाडीमध्ये बालक व गरोदर स्त्रियांसाठी असलेल्या शासकीय योजनांचा लाभ देण्यात येत नसून अंगणवाडी सेविका व मदतनिस नियमितपणे अंगणवाडीत येत नसल्यामुळे बालकांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंगणवाडी सेविका बाहेरगावी राहात असल्यामुळे अंगणवाडी सेविका कधीच वेळेवर पोहोचत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे व कसे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

यवतमाळ तालुक्यातील मौजे पांढुर्णा, प्रिंपी येथील ग्रामस्थांनी दिनांक २६.११.२०१४ रोजी तक्रार केली होती.

(२) अंशतः खरे आहे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद, यवतमाळ कार्यालयाचे पत्र क्र.१६७, दिनांक ०५.१२.२०१४ अन्वये तक्रारीची सखोल चौकशी करण्याकतरता चौकशी समिती नेमण्यात आली. त्यात फक्त ०३ वर्षे ते ०६ वर्षे वयोगटातील लाभार्थीना माहे ऑगस्ट, २०१४ ते नोव्हेंबर, २०१४ या कालावधीत गरम ताजा आहारापासून वंचित राहिले परंतु गरोदर व स्तनदा माता तसेच ०६ महिने ते ०३ वर्षे वयोगटातील लाभार्थींना घरपोच आहार देण्यात आला आहे व आरोग्य तपासणी, लसीकरण कार्यक्रम नियमितपणे घेण्यात आले आहे.

(३) अंशतः खरे आहे.

सदर अंगणवाडी सेविका ही चौकशीच्या कालावधीपर्यंत घुईखेड वरुन ये-जा करत होती सद्यस्थितीत अंगणवाडी सेविका अंगणवाडी स्थितगावात कायम वास्तव्यास राहात आहे.

(४) सदर प्रकरणात चौकशी समितीच्या अहवालानुसार दोषी आढळलेल्या दोन सुरपरवायझार यांना निलंबित करण्यात आले असून त्यांचेविरुध्द खाते चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच संबंधित मानधनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना कामाकाजात सुधारणा करण्याबाबत सक्त ताकीद देण्यात आली आहे.

---

**पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यातील वडकी, पारवा, घाटंजी, राळेगांव व पांढरकवडा येथे प्रचंड प्रमाणात अवैध धंदे सुरु असल्याबाबत**

**(१४) १३७२९ (०७-०४-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा व केळापूर (जि.यवतमाळ) तालुक्यातील वडकी, पारवा, घाटंजी, राळेगांव व पांढरकवडा हे पाचही पोलिस स्टेशन उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात येतात,या पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या परिसरात प्रचंड प्रमाणात अवैध धंदे सुरु असून उपविभागीय पोलिस अधिकारी संबंधित पो.स्टे.च्या ठाणेदारांकडून महिन्याला १० टक्के रक्कम घेत असल्यामुळे या परिसरातील अवैध व्यावसायीक मनमानी कारभार करुन धंदे करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या ठिकाणाहून महिन्याला १० टक्के रक्कम मिळते तेथे धाड न टाकता ज्या ठिकाणाहून हप्ते दिले जात नाहीत, अशा ठिकाणी उपविभागीय पोलिस अधिकारी धाडी टाकून त्यांच्याकडून रक्कम वसूल करतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत प्रशासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :** (१) व (२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) या तालुक्यात ८३ गावांपैकी ३० हून अधिक गावात अल्पसंख्याकांची बहुल ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रमामधून वगळयाबाबत**

**(१५) १३७६७ (०७-०४-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) या तालुक्यात ८३ गावांपैकी ३० हून अधिक गावात अल्पसंख्याकांची मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या असूनही त्यांची संख्या चुकीची दाखविण्यात आल्यामुळे अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रमामधून वेगळे करण्यात आल्यामुळे त्यांच्या विकासकामाला खीळ बसली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्पसंख्यांकांची लोकसंख्या योग्य दाखविण्यात येऊन त्यांना न्याय मिळण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे वारंवार निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०६-२०१५) :** (१) नाही.

अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रविकास कार्यक्रम ही योजना सन २००१ च्या जनगणनेनुसार मुंबई शहर व मुंबई उपनगर हे जिल्हे वगळता राज्यातील उर्वरित जिल्ह्यांतील ४४० ग्रामपंचायतींची तालुकानिहाय उदिष्ट या निकष्यावर राबविण्यात येते. त्यानुसार जिल्हा सोलापूरची अल्पसंख्याक लोकसंख्या १,८५,४६१ असून मंगळवेढा तालुक्याची अल्पसंख्यांक लोकसंख्या ६,८७५ (०.१०%) इतकी आहे. ज्या ग्रामपंचायतीतील अल्पसंख्याकांची लोकसंख्या कमीत कमी १०० किंवा अधिक आहे अशा ग्रामपंचायती निकषानुसार अनुदान मिळण्यास पात्र आहेत. त्यायोगे मंगळवेढा तालुक्याची निवड होऊ शकली नाही

(२) होय.

(३) व (४) सन २०११ च्या जनगणनेचा अल्पसंख्याक लोकसंख्येचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सोलापूर व मंगळवेढा तालुक्यातील अल्पसंख्याक समुहाची लोकसंख्या विचारात घेऊन विहीत निकषापनुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---

**सोलापूर जिल्ह्यात शुध्द दूधपूरवठा करण्यासाठी दूधाची**
**तपासणी करणारी पुरेशी यंत्रणा नसल्याबाबत**

**(१६) १३७७५ (०४-०४-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात शुध्द दूधपूरवठा करण्यासाठी दूधाची तपासणी करणारी यंत्रणा पुरेशी नसल्यामुळे ग्राहकांना चांगल्या प्रकारचे दूध मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दूधाची तपासणी करण्यासाठी यंत्रणा वाढविण्याबाबत व ग्राहकांना शुध्द दूध पुरवठा होण्यासाठी शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०५-२०१५) :** (१) नाही.

(२) प्राथमिक सहकारी दूध संस्थांकडून नियमित तपासणी होवून उच्च गुण प्रतीच्या निर्भेळ दूधाची स्विकृत होण्याकरिता सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षात सोलापूर जिल्हा संघाद्वारे राष्ट्रीय डेअरी प्लॅन मधून ३२ सहकारी दूध संस्थांना दूध तपासणी यंत्र, वजनकाटा, स्टल भांडी, एसएस कॅन इ. चा पुरवठा केला आहे. जिल्हा नियोजन व विकास मिती, सोलापूर यांच्या निधीतून एकात्मिक दुग्धविकास संस्थांना संगणक सचिव संचाचा पुरवठ केला आहे. यामुळे दुध उत्पादकांच्या दुधामधील फट, एसएनएफ, प्रोटीन, मिसळलेले पाणी इ. घटकांची तात्काळ तपासणी झाल्यामुळे दुधाच्या मूळ प्रतीमध्ये वाढ होवून दुधामधील भेसळ कमी होण्यास मदत होणार आहे.

सन २००७-०८ व सन २०१०-११ व सन २०११-१२ या वर्षात शिवामृत दुध संघाने केंद्रशासनाच्या स्वच्छ दूध योजनेंतर्गत २७ ठिकाणी बल्क मिल्क कुलर बसविलेले आहेत. सन २००७-०८ मध्ये १२० भेसळ तपासणी संच व ६० संस्थांना दूध गाळणी, स्टेनलेस स्टील भांडी इ. साहित्य दिलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यामध्ये स्वस्त धान्य दुकानांपर्यन्त द्वार वितरण व्यवस्था सुरु करण्याबाबतची मागणी**

**(१७) १३७८० (०७-०४-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) शहरापासून ते संबंधित स्वस्त धान्य दुकानापर्यंत वाहतुकीकरिता ३० ते ३५ रुपये खर्च येत असून शासनाकडून ९ रुपये ५६ पैसे इतकी रक्कम मिळत आहे, दुकानदारास सदर वाहतूक खर्च न परवडणारा असल्याने पूर्वीप्रमाणे द्वार वितरण व्यवस्था सुरु करावी, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०८-०५-२०१५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजीच्या मा.विधानसभा सदस्य यांच्या निवेदन पत्राच्या अनुषंगाने, सुधारित धान्य वितरण पद्धतीनुसार सोलापूर जिल्ह्यात सन २०१३-२०१६ या कालावधीसाठी अन्नधान्य वाहतुकीची निविदा प्रक्रिया निश्चित करण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर असून, वाहतूक कंत्राट निश्चित होताच मंगळवेढा (जि.सोलापूर) शहरापासून ते संबंधित स्वस्त धान्य दुकानापर्यंत वाहतुक सुरु करण्यात येईल, याबाबत मा.विधानसभा सदस्य यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भाळवणी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील माजी सरपंच यांची अज्ञात व्यक्तींनी धारदार शस्त्राने निर्घृण हत्या केल्याबाबत**

**(१८) १३७८३ (०७-०४-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भाळवणी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील माजी सरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य यांचा दिनांक १७ डिसेंबर, २०१४ रोजी भर रस्त्यावर काही अज्ञान व्यक्तींनी धारदार शस्त्राने निर्घृण खून करण्यात आल्यामुळे पंढरपूर शहर व तालुका परिसरात दहशतीचे व भितीचे वातावरीण पसरले असून सुरक्षितता धोक्यात आली असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी संबंधित पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात येऊनही अद्यापी गुन्हेगारांना पकडण्यात आले नसल्याने त्या भागामध्ये जनआंदोलन झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०५-२०१५) :** (१) भाळवणी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील माजी सरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य यांचा दि.१७ डिसेंबर, २०१४ रोजी भर रस्त्यावर काही अज्ञात व्यक्तींनी धारदार शस्त्राने निर्घृण खून करण्यात आला हे खरे आहे, तथापि, पंढरपूर शहर व तालुका परिसरात दहशतीचे व भितीचे वातावरण पसरले नसून सुरक्षितता धोक्यात आली असल्याचे आढळून आलेले नाही.
(२) व (३) सदर प्रकरणी पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे दि.१७.१२.२०१४ रोजी भाग ५ भारतीय दंडविधान संहिता कलम ३०२ प्रमाणे आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस दि.१८.१२.२०१४ रोजी अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे. तथापि, सदर गुन्ह्यामध्ये इतर आरोपींना अटक व्हावी म्हणून माहे जानेवारी, २०१५ मध्ये भाळवणी गावात जन आंदोलन केले होते.
(४) विलंब झालेला नाही.

---

## मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यामध्ये पर राज्यातून गुटखा व इतर अंमली पदार्थाची अवैध वाहतूक होत असल्याबाबत

**(१९) १३७८४ (०६-०४-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यामध्ये पर राज्यातून गुटखा व इतर अंमली पदार्थाची अवैध वाहतूक होत असताना अन्न व औषध प्रशासनाने सुमारे अडीच लाखांचा गुटखा जप्त केला असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने त्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरची अवैध वाहतूक कायमस्वरुपी बंद करण्यासाठी शासनाने कोणती उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२१-०५-२०१०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी अवैध वाहतुक करणाऱ्याकडून रु २,३६,८८०/- चा गुटखा जप्त करण्यात आला आहे व मंगळवेढा पोलीस स्टेशन येथे भारतीय दंड विधान १८८, २७३,३२८,३४ व अन्न

सुरक्षा व मानके कायदा २००६, नियम व नियमने २०११ अंतर्गत कलम २६ (२) (i) व २६ (२) (iv) अन्वये दि.०८/०१/२०१५ रोजी प्रथम खबरी अहवाल क्र.११/२०१५ नोंदविला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्याच्या चारही कृषी विद्यापीठातील क वर्ग व ड वर्गाच्या कर्मचा-यांना सुधारीत सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबत**

**(२०) १३७९० (०७.०४.२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्याच्या चारही कृषी विद्यापीठातील क वर्ग व ड वर्गाच्या कर्मचा-यांना सुधारीत सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या दरम्यान कृषी मंत्र्यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९.०५.२०१५) :** (१) होय.
(२) प्रस्तुत प्रकरण शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतील अभियंत्यांची रिक्त असलेली पदे**

**(२१) १३७९२ (०८-०४-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नव्या रस्त्यांची निर्मिती आणि जुन्या रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याची जबाबदारी असलेल्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतील विभागात महाराष्ट्रात ठिकठिकाणी अभियंत्यांची रिक्त पदे असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अभियंत्यांची पदे रिक्त असल्याने कामाची गती मंदावली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रिक्त पदे भरण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे, तसेच किती कालावधीत ही पदे भरण्यात येणार आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०५-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही.

प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेतंर्गत ज्या जिल्हयामध्ये अभियंत्यांची पदे रिक्त आहेत त्या पदांचा अतिरिक्त कार्यभार इतर जिल्हयातील संबंधित अभियंत्यांकडे देण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेतंर्गत च्या कामांची गती मंदावलेली नाही.
(३) व (४) प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेतंर्गतची रिक्त पदांवर प्रतिनियुक्तीने उमेदवार उपलब्ध करुन देण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागकडे पाठपूरावा करण्यात येत आहे.

---

**बेंबळा प्रकल्पामुळे बाधित गावातील भोई समाजातील लोकांना अग्रक्रमाने मासेमारिकीरता प्रकल्प देण्याबाबत**

**(२२) १३७९५ (३०-०४-२०१५). प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेंबळा प्रकल्प (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) मासेमारी करिता तयार असून याकरिता मत्स्यविभागातर्फे निविदा काढण्यात आल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निविदेची सद्यःस्थिती काय,
(३) असल्यास, प्रकल्पामुळे बाधित गावातील भोई समाजातील लोकांना अग्रक्रमाने मासेमारिकीरता प्रकल्प देण्याची शासनाकडे तरतुद आहे काय,
(४) असल्यास, अशा तरतुदीनुसार मासेमारी सोसायट्यांना विना निविदा सवलतीच्या दरात रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली आहेवा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०५-२०१५) :** (१) व (२) हो, ऑक्टोबर, २०१४ मध्ये दिलेलया जाहीर निविदा मध्ये तीन निविदा प्राप्त झाल्या असून स्थानिक मत्स्य संस्थेने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने सदर निविदा प्रक्रियेस स्थगिती देण्यात आली आहे. सद्यस्थितीत उक्त निविदा अद्याप उघडण्यात आलेल्या नाहीत.
(३), (४) व (५) नाही, सदर जलाशयाचे मासेमारी हक्क विभागस नोव्हेंबर, २००९ ला प्राप्त झाले असल्याने दि.१५/१०/२००१ च्या शासन निर्णयातील अट क्र.११ नुसार जाहीर निविदेने ठेका देणे आवश्यक आहे. तथापि, सदर परिसरातील स्थानिक मच्छिमारांना मासेमारी परवाना देऊन रोजगार उपलब्ध करुन देण्यात येते.

---

**बेंबळा प्रकल्प (ता.बांभुळगाव जि.यवतमाळ) अंतर्गत मोरगाव, चिखली आष्टा (ता.कळंब) उपकालव्याचे निकृष्ट दर्जाचे काम झाल्याबाबत**

**(२३) १३७९८ (०८-०४-२०१५). प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेंबळा प्रकल्प (ता.बांभुळगाव, जि.यवतमाळ) अंतर्गत मोरगाव, चिखली आष्टा (ता.कळंब) उपकालव्याचे निकृष्ट दर्जाचे काम झाल्यामुळे या भागातील जमिनी पाझरामुळे खराब झालयाचे दिनांक ७ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निकृष्ट दर्जाच्या कामांची चौकीशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) असल्यास, सदर प्रकल्पाच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे शेतक-यांच्या जमिनीचे झालेले नुकसान याबाबत शासन नुकसान भरपाई देणार आहे काय ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :** (१) नाही.

(२) क्षेत्रिय स्थळी भौगोलिक परिस्थितीमुळे होणा-या पाझरावर आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) कालव्याच्या पाझरामुळे शेतक-यांचे नुकसान होणार नाही याबाबत आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहे.

---

**राज्यातील गृहरक्षक दलाच्या (होमगार्ड) जिल्हा मुख्यालयातील साप्ताहिक परेड बंद केल्याबाबत**

**(२४) १३८३३ (०७-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गृहरक्षक दलाच्या (होमगार्ड) जिल्हा मुख्यालयांना साप्ताहिक परेड बंद करण्याचे आदेश दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजीच्या सुमारास देण्यात आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची परेड बंद करण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच कोल्हापूर जिल्हा समादेशक पद रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पद रिक्त असण्याची कारणे काय आहेत व हे रिक्त पद केव्हापर्यंत भरण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :** (१) होय.

तथापि, महासमादेशक, होमगार्ड या कार्यालयाच्या दि.२६.०३.२०१५ च्या आदेशान्वये प्रत्येक महिन्याच्या दुस-या रहिवारी सप्ताहिक कवायत चालू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२) साप्ताहिक कवायतींच्या होमगार्डच्या हजेरीपत्रकात अनयिमितता होत असल्याची बाब निदर्शनास आली होती. त्यामुळे साप्ताहिक कवायती बंद करण्यात आल्या होत्या.

(३) व (४) जिल्हा समादेशक, कोल्हापूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार अपर पोलीस अधिक्षक याचेकडे देण्यात आला आहे. होमगार्ड संघटनेच्या पुनर्रचनेचा प्रस्ताव विचाराधीन आहे. तद् नंतर या पदावर नियमित नियुक्ती करता येईल.

---

### कोल्हापूर जिल्हा नियोजन मंडळाकडून निम्म्या सदस्यांना नियोजन मंडळातून निधी मिळत नसल्याबाबत

**(२५) १३८४९ (०८-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा नियोजन मंडळाकडून जिल्हा परिषदेला मिळणा-या निधीतून नियोजन मंडळाच्या सदस्यांच्या मतदार संघातीलच कामांसाठी निधी देण्यात येत असल्याने सुमारे निम्म्या सदस्यांना नियोजन मंडळातून निधी मिळणार नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सदस्यांनी पूर्वीप्रमाणे निधी मिळण्याची मागणी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरूप काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०५-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) जिल्हा नियोजन समिती ही घटनात्मक समिती असल्याने शासनाने मंजूर केलेल्या नियमव्ययानुसार जिल्ह्यात मंजूर योजनेखाली कामे घेण्याबाबतचा निर्णय सदर समितीद्वारे घेण्यात येतो.

---

### शासनाने अल्पसंख्यांक मुस्लीम, शीख, बुध्दीस्ट व जैन समाजाची अधिक लोकसंख्या गावातील भागाचा विकास करण्याबाबत

**(२६) १३८७५ (०७-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने अल्पसंख्यांक मुस्लीम, शीख, बुध्दीस्ट व जैन समाजाची अधिक लोकसंख्या गावातील भागाचा विकास करण्यासाठी निर्णय घेतला आहे त्याची अंमलबजावणी दिनांक १४ मे, २०१३ पासून करण्यात आली आहे त्यासाठी दरवर्षी सोलापूर जिल्ह्यात १ कोटी २० लाख रुपये दिले जातात मात्र योजनेतून उत्तर सोलापूर व मंगळवेढा तालुके वगळण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेमध्ये उत्तर सोलापूर व मंगळवेढा तालुक्याचा समावेश करण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०६-२०१५) :** (१) अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रविकास कार्यक्रम या योजने अंतर्गत सन २००१ च्या जनगणनेनुसार मुंबई शहर व मुंबई उपनगर हे जिल्हे वगळता राज्यातील उर्वरित जिल्ह्यांतील ४४० ग्रामपंचायतींचे वार्षिक उदिष्ट पायाभूत सुविधाच्या अनुदानांसाठी निश्चित करण्यात आले आहे. तसेच ज्या ग्रामपंचायतील अल्पसंख्याकांची लोकसंख्या कमीत कमी १०० किंवा अधिक आहे अशा ग्रामपंचायती निकषानुसार अनुदान मिळण्यास पात्र आहेत. सन २००१ च्या जनगणनेनुसार सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील एकूण १२ ग्रामपंचायती पायाभूत सुविधासाठी अनुदान मिळण्यास पात्र आहेत. सन २०११ च्या जनगणनेच्या अहवालातील (अहवाल अद्याप अप्राप्त) सोलापूर व मंगळवेढा तालुक्यातील अल्पसंख्याक समुहाची लोकसंख्या विचारात घेऊन अनुदानास पात्र ठरविण्यातसाठी पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर पेयजल उजनीतून उन्हाळी हंगामासाठी दोन पाणी आवर्तने व नदीतून एकवेळा पाणी सोडण्याची मागणी

**(२७) १३८७६ (०७-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर पेयजल उजनीतून उन्हाळी हंगामासाठी दोन पाणी आवर्तने व नदीतून एकवेळा पाणी सोडण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०५-२०१५) :** (१) होय.

प्रस्तुत प्रकरणी संबंधित लोप्रतिनिधी यांनी मा.मंत्री, जलसंपदा यांच्या अध्यक्षतेखाली दि.१९/१२/२०१४ व दि.२४/०३/२०१५ रोजी उजनी धरणातील सन २०१४-१५ च्या पाणी नियोजनाच्या बैठकीत उजनी धरणातून सोलापूर शहरासाठी पिण्यासाठीचे पाणी भिमा नदीत सोडण्याबाबत मागणी करण्यात आली होती.
(२) उन्हाळी हंगामासाठी दि.२५./०३/२०१५ ते ०४/०४/२०१५ पर्यंत ५.४९ टीएमसी पाणी उजनी धरणातून भीमा नदीत सोडण्यात आले आहे. तसेच दि.२५/०५/२०१५ ते ०५/०६/२०१५ पर्यंत ५.५० टीएमसी पाणी सोडण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हा नियोजन समितीकडून विविध विभागांना विकास कामांसाठीचा मंजूर निधी पडून असल्याबाबत**

**(२८) १३८८० (०८-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा नियोजन समितीकडून विविध विभागांना विकास कामांसाठी निधी उपलब्ध केला जातो पण सन २०१४-१५ या वर्षामध्ये निधी मंजूर होऊनही विभागाच्या अकार्यक्षमतेमुळे ३५ कोटी रुपयाचा निधी पडून आहे, यामध्ये सिंचन, क्रिडा, शिक्षण, पाणलोट या विभागासाठी निधी मंजूर करण्यात आला असल्याचे उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अखर्चित निधीसंदर्भात शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०१५) :** (१), (२) व (३) सोलापूर जिल्ह्याच्या सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना, सन २०१४-१५ करिता रु.२७५.०० कोटी इतका नियतवय मंजूर तथा अर्थसंकल्पीत करण्यात आला असून तो जिल्ह्यास पूर्णपणे वितरीत करण्यात आला आहे.

वितरीत निधीपैकी मार्च, २०१५ अखेर रु.२७४.९० कोटी इतका खर्च झाला आहे व रु.१०.०० ला प्रत्यार्पित झाले आहेत.

सबब, सोलापूर जिल्ह्याच्या विकास कामांचा निधी पडून आहे असे म्हणता येणार नाही.

---

**यवतमाळ जिल्ह्यातील अमरावती महसूल विभागातील सुमारे दिड हजार ग्रामपंचायती ऑडिट झाले नसल्याबाबत**

**(२९) १३८८९ (०८-०४-२०१५). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील अमरावती महसूल विभागातील सुमारे दिड हजार ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहराचे गेल्या तीन ते सात वर्षापासूनप ऑडिटच झाले नसल्याची धक्कादायक बाब दिनांक ३१ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑडिट न झाल्याने सदर ग्रामपंचायतीमधील आर्थिक गैरव्यवहार दडला असल्याचेही दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इतके वर्षे होऊनही अद्यापपर्यंत ऑडिट का करण्यात आले नाही,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन ऑडिट टाळणाऱ्यावर काय कारवाई करणार आहे,

(५) असल्यास, सदर दीड हजार ग्रामपंचायतीचे ऑडिट कधीपर्यंत करण्यात येणार आहे,

(६) असल्यास, त्यानुसार ऑडिट मध्ये गैरव्यवहार झाल्याचे आढळून आल्यावर शासन त्यावर कोणती कारवाई करणार आहे वा करित आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०५-२०१५) :** (१), (२), (३) व (४) अमरावती महसूल विभागातील यवतमाळ जिल्ह्यात एकूण १२१० ग्रामपंचायती असून सन २००९-१० या वर्षापर्यंतचे सर्व ग्रामपंचायतचे लेखापरिक्षण पूर्ण झाले आहे. सन २०१०-११ ते २०१२-१३ चे १२१० ग्रामपंचायतीपैकी ७८७ ग्रामपंचायतींचे लेखा परिक्षण पूर्ण झाले असून ४२३ ग्रामपंचायतीचे लेखा परिक्ष्उण प्रलंबित आहे. त्यांच्या लेखापरिक्षणाचे काम सध्या प्रगतीत आहे.
(५) ग्रामपंचायत लेखा परिक्षण स्थानिक निधी लेखा परिक्षा म.रा.यवतमाळ यांचे नियपोजनानुसार केले जाते. सन २०१०-११ ते २०१२-१३ या वर्षाचे ४२३ ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण प्रलंबित असून सदर लेखा परिक्षण माहे जून, २०१५ अखेर पूर्ण करण्यात येणार आहे. तसेच, जुलै, २०१५ पासून सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षण नियोजित दौरा कार्यक्रमानुसार पूर्ण करण्यत येणार आहे.
(६) ऑडिटमध्ये गैरव्यवहार आढळून आल्यास त्याची प्राथमिक चौकशी गट विकास अधिकारी यांचेमार्फत करुन चौकशी अहवालाच्या अनुषंगाने अपहाराची रक्कम निश्चित झाल्यास अपहार रक्कम संबंधितांकडून वसूल करण्याची कारवाई केली जाते. तसेच नियमानुसार कारवाई करण्यात येते.

---

## नाशिक जिल्ह्यातील शासकीय गोदामामध्ये पुरवठा विभागाच्या अन्नधान्याच्या हाताळणुकीबाबत झालेली बैठक

**(३०) १३९२५ (०७-०४-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील शासकीय गोदामामध्ये पुरवठा विभागाच्या अन्नधान्याची हाताळणुक याबाबत तत्कालीन अन्न नागरी पुरवठा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११ सप्टेंबर, २०१२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यात कोणकोणते निर्णय घेण्यात आले आहेत, तसेच सदर निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०५-२०१५) :** (१) होय, तथापि, सदरची बैठक मा.मंत्री, अ.ना.पु. व ग्रा.सं. यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.
(२) व (३) दि.११ सप्टेंबर, २०१२ रोजी झालेल्या बैठकीत खालील निर्णय घेण्यात आला.
अन्नधान्य हाताळणुकीच्या कामासाठी निश्चित करण्यात येणा-या कंत्राटाच्या करारनाम्यात, समाविष्ट नसलेल्या/ दर न ठरविण्यात आलेल्या कामांबाबत जिल्ह्यातील माथाडी मंडळाने दर निश्चित करावेत व सदर दर जिल्हा पुरवठा अधिकारी यांना कळवावेत. जिल्हयातील माथाडी मंडळाने अन्नधान्य हाताळणुकीच्या सर्व बाबींबाबत दर निश्चिती केल्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकारी, यांनी प्रस्ताव शासनास सादर करावा व सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर अन्न, नागरी पुरवठा विभागाने कामगार विभागाच्या सहमतीने सध्याच्या

धोरणातील/शासन निर्णयातील तरतुदी तपासून पुनर्निविदा काढण्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा.

सदर निर्णयाच्या अनुषंगाने नाशिक जिल्हयातील माथाडी मंडळाकडून दि.२७/१२/२०१२, दि.२२/०७/२०१४ व दि ०९/०८/२०१४ अन्वये जिल्हा पुरवठा कार्यालयास आधारभूत दर प्राप्त झालेले असून, जिल्हास्तरावर अन्नधान्य हाताळणुकीच्या कामाबाबत आधारभूत दर निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**नाशिक जिल्हयातील दारिद्र्यरेषेखालील गरीब आदिवासींसाठीची बंद असलेली खावटी योजना पूर्ववत सुरु करण्याबाबत**

**(३१) १३९३२ (१०-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील दारिद्र्यरेषेखालील वाड्यापाड्यात राहणा-या गरीब आदिवासींसाठी पावसाळ्यात कामधंदा मिळत नसल्यामुळे त्यांची उपासमारी रोखण्यासाठी सुरु करण्यात आलेली खावटी योजना सध्या बंद असल्यामुळे या आदिवासींवर उपासमारीची वेळ येत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्या बंद असलेली खावटी योजना पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०३-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) पावसाळ्यात जून ते सप्टेंबर या कालावधीत रोजगाराविना आदिवासींच उपासमार होऊ नये याकरिता सन १९७८ पासून खावटी कर्ज योजना सुर करण्यात आली असून सन २०१३-१४ पर्यंत खावटी कर्जाचे वाटप करण्यात आले आहे. या योजनेच्या तरतूदीनुसार खावटी कर्ज थकित असलेल्या लाभार्थ्यांना पुन्हा खावटी कर्ज वाटप करण्यात येत नाही. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात नवीन लाभार्थी उपलब्ध न झाल्याने खावटी कर्ज योजनेंअंतर्गत खावटी कर्जाचे वाटप करता आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात बालमजुरी कमी करण्यासाठी कठोर कायदे करण्यात येत असून सुध्दा नाशिक जिल्हयातील घोटी (ता.इगतपुरी) येथे शासनाने नियम धाब्यावर बसविण्यात आल्याबाबत**

**(३२) १३९३७ (०७-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बालमजुरी कमी करण्यासाठी कठोर कायदे करण्यात येत असून सुध्दा

नाशिक जिल्ह्यातील घोटी (ता.इगतपुरी) येथे शासनाने नियम धाब्यावर बसविण्यात येवून वाडीव-हे ते भंबाळा फाटा या रस्त्यांच्या कामावर बालमजूर ठेवण्यात आल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बालमजुराकडून रस्त्याचे काम करुन घेणाऱ्यावर कारवाई करण्याबाबत तसेच यापुढे असे प्रकार घडू नयेत याची दक्षता घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०५-०६-२०१५) :** (१) हे खरे आहे नाही.
(२) व (३) याबाबत चौकशी केली असता राष्ट्रीय महामार्ग क्र.३ वरील वाडीव-हे ते भंबाळा फाटा रोडवरील रस्ता रुंदीकरणाच्या कामावर बालकामगार कार्यरत असल्याचे आढळून आलेले नाही. बालकामगार या अनिष्ट प्रथेचे निर्मूलन करण्याच्या योजनेंतर्गत जिल्हा स्तरावर कृतीदलांच्या माध्यमातून धाडी टाकून कामावर बालकामगार ठेवणा-या आस्थापनेविरुध्द कारवाई करण्यात येते. नाशिक जिल्ह्यासाठी सदर कृतीदल कार्यरत असून या कृतीदलामार्फत वेळोवेळी धाडी टाकल्या जात असतात.

---

### अचलपूर (ता, जि.अमरावती) येथील जिल्हा परिषद शाळांसह सर्व शाळांना पुरविण्यात येणा-या शालेय पोषण आहाराचे धान्य परस्पर गहाळ होत असल्याबाबत

**(३३) १३९५० (०९-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अचलपूर (ता. जि.अमरावती) येथील जिल्हा परिषद शाळांसह सर्व शाळांना पुरविण्यात येणा-या शालेय पोषण आहाराच्या तांदळासह अनेक प्रकारचे शेकडो क्विंटल धान्य परस्पर गहाळ करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सुरू असलेल्या गैरप्रकाराची शासनाने त्वरीत चौकशी करुन आवश्यक कारवाई करणार आहे काय वा करीत आहे,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील आंबाबारी येथे देहली सिंचन प्रकल्पाबाबत

**(३४) १३९८१ (०८-०४-२०१५). श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील आंबाबारी येथे देहली सिंचन प्रकल्प या शासनाच्या महत्वाकांक्षी प्रकल्पाची सद्यःस्थिती काय आहे,

(२) असल्यास, या प्रकल्पामुळे त्या परिसरातील किती गावे विस्थापित होणार आहेत,

(३) असल्यास, विस्थापित होणा-या गावांच्या पुनर्वसनाबाबत शासनाने कोणती पावले उचलली आहेत,

(४) तसेच, सदर प्रकल्प अजूनपर्यंत प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५) :** (१) सदर प्रकल्पाचे माती धरणाचे काम ६०% पूर्ण झाले असून सांडवा बांधकाम १००% पूण झाले आहे. मुख्य कालव्याचे किमी १ ते ९४ लांबीतील मातीकाम व बांधकामे अंशतः पूर्ण झाली असून उर्वरित काम प्रगतीत आहे.

(२) देहली प्रकल्पांतर्गत आंबाबारी ता. अक्कलकुवा हे गाव विस्थापीत होणार आहे.

(३) प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत सन १९९९ च्या पूनर्वसन अधिनियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रकल्पग्रस्तांनी वेळोवेळी तीव्र विरोध करुन प्रचलित शासन धोरणानुसार देय नसलेल्या काही मागण्या केल्याने तसेच प्रकल्पग्रस्तांनी मागण्याचे स्वरुप सतत बदलते ठेवल्यामुळे प्रकल्पाचे काम रेंगाळले आहे.

---

## नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्यातील इच्छागव्हाण धरणाला शासनाच्या मान्यतेबाबत

**(३५) १३९८२ (०८-०४-२०१५). श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्यातील इच्छागव्हाण धरणाला शासनाची मान्यता मिळाली आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्ष काम केव्हा सुरु होईल,

(३) असल्यास, सदर धरणाचे काम सुरु होण्याकरिता शासनाने कोणती पावले उचललेली आहेत,

(४) नसल्यास, सदरहू प्रकल्पास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०५-२०१५) :** (१) होय, दिनांक २/२/१९९९ रोजी रु.४.४० कोटी किंमतीच्या उक्त योजनेच्या प्रकल्प अहवालास तापी पाटबंधारे विकास महामंडळाने प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(२) सदर योजनेसाठी वनजमिन हस्तांतरणांबाबतची कार्यवाही प्रगतीत असून वनजमिन हस्तांतरण प्रस्तावास केंद्र शासनाची अंतिम मान्यता मिळाल्यानंतर प्रकल्पाचे कामे प्रत्यक्ष सुरु करण्यात येईल.
(३) सद्यस्थितीत वनजमिन हस्तांतरण प्रस्तावावर अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक नागपूर यांनी दिनांक ५/९/२०१३ रोजी उपस्थित केलेल्यं शे-यांची पुर्तता सुरु आहे.
(४) वनजमिन हस्तांतरणा अभावी प्रकल्पास विलंब होत आहे.

---

**नागपूर महानगरपालिकेच्या विस्तारासोबतच शहरात टोलेजंग इमारती उभ्या राहत असताना महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडे जुनीच यंत्रणा असल्याबाबत**

**(३६) १४००० (०७-०४-२०१५). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महानगरपालिकेच्या विस्तारासोबतच शहरात टोलेजंग इमारती उभ्या राहत असताना महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडे १५-२० वर्षापूर्वी जी यंत्रणा होती तीच आजही कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शहरात २०-२२ मीटर उंचीच्या इमारतीत आग लागल्यास ती आटोक्यात आणणारी यंत्रणा या विभागाकडे नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर शहरातील अग्निशमन विभाग सुसज्ज करण्याबाबत व अधिकारी कर्मचाऱ्यांची भरती करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करीत आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) १३ अग्निशमन स्थानके व त्याकरीता आवश्यक असणा-या २५४ वाढीव पदे निर्मितीची व आकृतीबंद बाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेने महासभेपुढे सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूरच्या तीन विभागात वीज वितरण करणा-या एसएनडीएल फ्रेंचायझीचे ऑडिट करण्याबाबत**

**(३७) १४००१ (०७-०४-२०१५). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूरच्या तीन विभागात वीज वितरण करणा-या एसएनडीएल फ्रेंचायझीच्या वाढणा-या तक्रारी बघता कंपनीच्या तीन वर्षाच्या प्रशासकीय कामाचे गुणवत्ता ऑडिट करण्याचे आदेश ऊर्जामंत्र्यांनी जानेवारी, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार ऑडिट पूर्ण झाले आहे काय,
(३) असल्यास, ऑडिटमध्ये काय आढळून आले आहे त्यानुसार कंपनीवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :** (१) होय.
(२) संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधार कंपनी मर्यादित यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधक समिती मे.एस.एन.डी.एल. नागपूरच्या विविध कामाचा आढावा घेऊन अभिप्राय यादर करणार आहे.
(३) अद्याप अभिप्राय अप्राप्त आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील गेल्या ४० वर्षापासून प्रलंबित असलेल्या सार्वजनिक ग्रंथालय सेवकांच्या वेतनश्रेणी व सेवा नियमाबाबत**

**(३८) १४००७ (०८-०४-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय सेवकांच्या गेल्या ४० वर्षापासून प्रलंबित असलेल्या वेतनश्रेणी व सेवानियमांबाबतच्या मागणीवर शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-०६-२०१५) :** (१) व (२) राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचारी हे शासकीय कर्मचारी नसल्यामुळे त्यांना वेतनश्रेणी देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तथापि वाढती महागाई व पुस्तकांच्या वाढत्या किंमती लक्षात घेवून या कर्मचा-यांच्या वेतनात वाढ होण्याच्यादृष्टीने, शासन निर्णय दिनांक २१.२.२०१२ अन्वये राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या परिक्षण अनुदानात ५०% वाढ करण्यात आलेली आहे.

तसेच या शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबींमध्ये एकसूत्रता येण्यासाठी त्यांना द्यावयाच्या सेवाविषयक सवलती व सुविधांविषयक मार्गदर्शक तत्वांबाबतचे परिपत्रक, ग्रंथालय संचालनालयाने दिनांक ८.५.२०१३ अन्वये निर्गमित करण्यात आल आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात एलबीटी ऐवजी आयजीएसटी कर लावण्याबाबत**

**(३९) १४००९ (०८-०४-२०१४). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एलबीटी ऐवजी आयजीएसटी कर लावण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०५-२०१५) :** (१) मार्च २०१५ च्या अर्थसंकल्पीय या भाषणात १ ऑगस्ट २०१५ च्या पासून एलबीटी रद्द करण्यात येईल. असे घोषित केले आहे. तथापि एलबीटी ऐवजी आयजीएसटी लावण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(२) लागू नाही.

(३) लागू नाही.

---

**निम्न पेढी प्रकल्प (जि.अमरावती) बाधीत क्षेत्रातील**
**गावाचे पुनर्वसन न झाल्याबाबत**

**(४०) १४०४२ (०८-०४-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निम्न पेढी प्रकल्प (जि.अमरावती) चे काम बाधीत क्षेत्रातील गावांचे पुनर्वसन न झाल्या कारणाने मागील चार वर्षापासून काम बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प पुर्ण करण्याचे व पुनर्वसन पुर्ण करण्याचे काय नियोजन आहे,

(३) असल्यास, प्रकल्पाचे काम केव्हा पुर्ण होऊन व सिंचन क्षमता पुर्णतः टप्प्या टप्प्याने वर्षानिहाय कशाप्रकारे निर्माण होईल,

(४) तसेच, सदर प्रकल्प पुर्ण करण्याबाबत शासनाचे काही धोरण ठरले आहे काय व असल्यास ते काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :** (१) होय, धरणाचे काम पुनर्वसना अभावी मार्च, २०१३ पासुन बंद आहे.

(२) सदर प्रकल्पाचे पुनर्वसन सन २०१७ पर्यत पूर्ण करुन, प्रकल्पाचे काम सन २०१९-२०२० पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रकल्पाचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार व पुनर्वसन पुर्ण झाल्यानंतर पहिल्या टप्यात २००० हेक्टर, दुसऱ्या टप्यात ४००० हे. व तिसऱ्या टप्यात ६,२९२ हेक्टर. सिंचन क्षमता निर्माण करण्याचे नियोजीत आहे.

(४) निम्न पेढी प्रकल्प हा सिंचन अनुशेष कार्यक्रमामध्ये समाविष्ट आहे. त्यानुसार वर नमुद केलेनुसार प्रकल्प जून २०२० पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन केले आहे.

---

**अमरावती अनुशेषा अंतर्गत असलेल्या प्रकल्पांकरीता**
**सन २०१४-१५ मध्ये प्राप्त निधी व खर्चाबाबत**

**(४१) १४०४४ (०८-०४-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील अनुशेष अंतर्गत असलेल्या प्रकल्पांकरीता वर्ष २०१४-१५ करीता किती निधी प्राप्त आहे व त्यापैकी आतापर्यंत किती निधी खर्च करण्यात आला आहे,

(२) असल्यास, उपलब्ध निधी पुर्ण खर्च करण्यात आला काय,

(३) नसल्यास, निधी अखर्चित राहण्याची कारणे काय,

(४) तसेच, वर्ष २०१५-१६ करीत अनुशेष अंतर्गत असलेल्या प्रकल्पांकरीता किती निधी आवश्यक आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०६-२०१५) :** (१) अमरावती जिल्ह्यातील अनुशेष अंतर्गत असलेलया राज्यस्तरीय प्रकल्पांकरिता वर्ष २०१४-१५ मध्ये रु.३०२.४७ कोटी प्राप्त आहे व त्यापैकी फेब्रुवारी, २०१५ पर्यंत रु.२१४.५५ कोटी इतका निधी खर्च झाला आहे.

(२) नाही.

(३) भूसंपादन, पुर्वसन, वनजमिन हस्तांतरण तसेच प्रकल्पांन सुधारित प्रशासकीय मान्यते अभावी निधी खर्च होवू शकलेला नाही.

(४) सन २०१५-१६ मध्ये अमरावती जिल्ह्यातील प्रकल्पांना रु.२८८.९५ कोटी अनुदान प्राप्त आहे. तसेच फेब्रुवारी, २०१५ अखेर सुमारे ४७२.५३ कोटी इतका निधी शिल्लक आहे. हा निधी सन २०१५-१६ मध्ये पुरेसा आहे.

---

**अमरावती जिल्ह्यातील सिंचन अनुशेषाबाबत**

**(४२) १४०४५ (०८-०४-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्याचा सद्य:स्थितीत सिंचन अनुशेष किती आहे,

(२) असल्यास, अनुशेष निर्मुलना संदर्भात शासनाचे काय नियोजन आहे व त्याबद्दल काय अडचणी आहेत,

(३) असल्यास, अडचणी सोडवून सिंचन अनुशेष निर्मुलन करण्याची शासनाची योजना आहे काय,

(४) असल्यास, उपाय योजनांची सविस्तर माहिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०६-२०१५) :** (१) अमरावती जिल्ह्याचा जून २०१४ अखेर सुमारे ७७.४८ हजार हेक्टर रब्बी समतुल्य भौतिक अनुशेष शिल्लक आहे.

(२) अमरावती जिल्ह्यात अनुषेश्ष निर्मुलन कार्यक्रमांतर्गत ३४ प्रकल्पांचा समावेश आहे. सदर प्रकल्प पुर्णत्वास नेण्यामध्ये भूसंपदान, पुनर्वसन, वनजमिन हस्तांतरण, सुधारित प्रशासकीय मान्यता या प्रमुख अडचणी आहेत.

(३) होय.

(४) प्रकल्पातील अडचणी सोडवणेसाठी विशेष प्रयत्न करणे, जलद निर्णय प्रक्रियेसाठी अधिकाराचे विकेंद्रीकरण करणे, पुरेसा अधिकारी वर्ग व आवश्यक निधी प्राधान्याने उपलब्ध करुन देणे व अनुशेष निर्मुलन कामाचे नियमितपणे संनियंत्रण करणे असे शासनाने आखलेल्या योजनेचे स्वरुप आहे.

---

**अमरावती शहरात जड वाहने व हलकी मालवाहू वाहनांना**
**काढलेल्या प्रवेशबंदी अधिसुचनेबाबत**

**(४३) १४०४६ (०७-०४-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरात जडवाहने व मालवाहू वाहनांना दररोज सकाळी ६.०० वा. ते रात्री २२.३० वा.पर्यंत येण्यास व जाण्यास मनाई करण्यात आली आहे, अशा आशयाची सुचना पोलीस उपायुक्त (मुख्यालय) यांनी दिनांक ३१जानेवारी,२०१५ रोजी निर्गमित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक व्यापा-यांनी विरोध करुन ही वेळ कमी करण्यात यावी अशा आशयाचे निवेदन विविध वाहतूक संघटनांनी पोलीस आयुक्त, अमरावती यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाचे अनुषंगाने प्रशासनातर्फे कोणती कार्यवाही केली करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे. तथापि, जड व मालवाहू वाहनांना शहरामध्ये सकाळी ६.०० ते १०.०० वाजेपर्यंत मनाई करण्यात आलेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने दि.३१.१.२०१५ ची अधिसूचना स्थगित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पेढी बॅरेज (अमरावती जिल्हा) प्रकल्पाच्या सद्यस्थितीबाबत**

**(४४) १४०४८ (०८-०४-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेढी बॅरेज (जिल्हा अमरावती) चे कामाची सद्यस्थिती काय आहे,
(२) तसेच, सदर प्रकल्पाचे काम पुर्ण करण्याचे काय नियोजन आहे,
(३) या प्रकल्पाद्वारे बाधीत होणा-या गावाची पूर्नवसना बाबतची सद्यस्थिती काय आहे,
(४) तसेच, पुर्नवसन पूर्ण करण्याबाबतचे काय नियोजन आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :** (१) प्रकल्पाचे मातीकाम काम ५० टक्के झाले असून भूसंपादन व पूनर्वसनाच्या अडचणी मुळे सद्या प्रकल्पाचे काम बंद आहे.
(२) भूसंपादन व पूनर्वसनाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाचे काम २ वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) सदर प्रकल्पाद्वारे रोहणखेडा, पर्वतापुर व दोनद या तीन गावांचे पुनर्वसन करावयाचे असून यापैकी रोहणखेड व पर्वतापुर गावाचे पुनर्वसनासाठी निश्चित केलेल्या नवीन गावठाणाचे जागेस तेथील शेतकऱ्यांचा विरोध असल्याने भुखंडाऐवजी एकमुस्त मोबदला देण्याची मागणी पुनर्वसित होणाऱ्या गावकऱ्यांनी केली आहे. उर्वरीत दोन गावाचे पुनर्वसनासाठी आवश्यक जमिनीचे भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) बाधित होणाऱ्या तीन गावांपैकी रोहणखेड व पर्वतापुर येथील पुनर्वसित होणाऱ्या गावकऱ्यांचा एकमुस्त मोबदल्याचा प्रस्ताव शासनाचे विचाराधिन आहे. दोनद गावाचे पुनर्वसनासाठी महसुल विभागामार्फत नवीन गावठाणाची जागा निश्चितीनंतर नागरी सुविधांची कामे पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**पांढरकडा, आर्णी व घाटंजी (जि.यवतमाळ) या तालुक्यात घरफोडी, सराफा दुकानातील चो-याबाबत**

**(४५) १४०५३ (०७-०४-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्णी व घाटंजी (जि.यवतमाळ)या तालुक्यात तसेच पांढरकडा येथे घरफोडी, सराफा दुकानातील चो-यामुळे या शहरातील नागरिक त्रस्त झाली असून याकडे पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकारामुळे सराफ व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर घटनांवर प्रतिबंध घालून या घटनांकडे दुर्लक्ष करणा-या अधिका-यावंर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) यवतमाळ जिल्हयात घरफोडी व सराफ दुकानातील चोरीसंदर्भात पोलीस स्टेशनमध्ये नोंद झालेल्या सर्व गुन्हयांचा तपास करण्यात आला आहे. गुन्हयाचा सखोल तपास करुन ज्या गुन्हयात आरोपी सापडले आहेत त्यांना अटक करण्यात येऊन त्यांच्याविरुध्द न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

घरफोडी व सराफ दुकानातील चोरीसंदर्भात पोलीसांकडून कोणतेही दुर्लक्ष झाले नसल्यामुळे पोलीस अधिका-यांविरुध्द कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वणी तालुक्यात (जि.यवतमाळ) शेतात कापूस वेचत असलेल्या महिलेवर वाघाने हल्ला केल्यामुळे तिचा मृत्यू झाल्याची घटना**

**(४६) १४०५९ (०८-०४-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी तालुक्यात (जि.यवतमाळ) शेतात कापूस वेचत असलेल्या जीजी बलकी या महिलेवर वाघाने हल्ला केल्यामुळे तिचा मृत्यू झाल्याची घटना माहे जानेवारी, २०१५ च्या तिस-या आठवड्यात घडल्यामुळे परिसरातील शेतमजूर व शेतकरी वर्गात प्रचंड घबराहटीचे वातावरण पसरलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदर घटनेत मृत पावलेल्या महिलेच्या कुटुंबियास शासनाने कोणती मदत केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) उक्त, तालुक्यात वनविभागाने वाघाच्या बंदोबस्ताकरिता कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :**(१), (२) व (३) दिनांक २४.०१.२०१५ रोजी यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा वनविभगांतर्गत वणी तालुक्यातील मौजे गोंडगाव येथे राहण्या-या सौ. जिजाबाई दादाजी बलकी ह्या कापूस वेजण्यासाठी शेतात गेलया असता वाघाच्या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला आहे. सदर मृत महिलेच्या कायदेशीर वारसास शासन निर्णयातील तरतूदीनुसार रु.८.०० लक्ष नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली आहे.

(४) व (५) वणी (प्रादेशिक) वनपरिक्षेत्रातील सुकनेगांव तसेच झारी-जामणी परिसरात पाहण्यात असलेल्या व मानवी जिवीतास धोकादायक ठरलेल्या वाघास व्याघ्र संर्वधन प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी जारी केल्या मार्गदर्शक सूचना व गरजेप्रमाणे तज्ञांचे उपस्थितीत बेशुध्द करुन बंदिस्त करण्याबाबत मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी दिनांक २८.०४.२०१५ रोजी आदेश जारी केले आहेत.

---

**अमरावती जिल्हयातील मोठ्या, मध्यम व लघुसिंचन प्रकल्पांतबाबत**

**(४७) १४०६८ (०८-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील मोठ्या, मध्यम व लघुसिंचन प्रकल्पांत सद्यस्थितीत ५९.०४ टक्के जलसाठा आहे गत वर्षाच्या तुलनेत तो सहा टक्क्यांनी कमी आहे मात्र रब्बी हंगाम आटोपात आल्याने उन्हाळी पिकांसाठी पाण्याची फारशी मागणी होत नसल्याने उन्हाळ्यात पाण्याचे संकट निर्माण होण्याचा धोका असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरात नागरिकांची पाण्याची गैरसोय होणार आहे हे पाहता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०६-२०१५) :** (१) अमरावती प्रादेशिक विभागांतर्गत अमरावती जिल्हयात जून २०१४ अखरे ८५५.१९७ दलघमी पाणीसाठा निर्मित झाला आहे. दिनांक १५/११/२०१४ रोजी या प्रकल्पांमध्ये ७६५.०६ दलघमी पाणीसाठा उपलब्ध होता. माहे जानेवारी, २०१५ अखरे ५१२.५९ दलघमी (५७.९० टक्के) पाणी साठा उपलब्ध होता.

(२) प्रशासनाकडून घरगुती वापराकरीता पाणीसाठा मागणीनुसार राखुन ठेवण्यात येतो. यामुळे नागरिकांची गैरसोय होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्राम कार्तुली (ता.आमगांव, जि.गोंदिया) निवासी सुशील सिताराम कोरेची हत्या करण्यात आल्याबाबत**

**(४८) १४०७७ (०७-०४-२०१५). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्राम कार्तुली, ता.आमगांव, जि.गोंदिया निवासी सुशील सिताराम कोरेची यांची दिनांक २५ डिसेंबर, २०१४ रोजी हत्या करुन मृतदेह कार्तुली- इर्री मार्गावर टाकण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीसव्दारे सदर प्रकरणी एक्सीडेंट म्हणून कोणतीही कार्यवाही न केल्याने स्थानीय लोकांनी हत्येचा संशय व्यक्त करुन कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :** (१) नाही.

सुशिल सिमाराम कोरे यांचा मृतदेह कार्तुली-ईरी मार्गावर सापडला. तथापि, या प्रकरणी खुन किंवा अपघात झाला आहे याबाबत पुरावे आढळून आले नाहीत.
(२) व (३) या प्रकरणी, रविंद्र सिताराम कोरे यांनी दिलेलया तक्रारीमध्ये मृतक हा अपघातात गंळीर जखमी होवून मरण पावला, असे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे. मृतकाची हत्या झाल्याबाबत कोणताही पुरावा आढळून आलेला नाही. त्यामुळे ही त्या आहे की अपघात आहे. हे स्पष्ट होत नसल्यामुळे पोलीसांकडून चौकशी सुरु आहे.

या संबंधात कोणतीही लेखी तक्रार नसलयामुळे गुन्हा दाखल न करता अकस्मात मृत्यूची चौकशी सुरु आहे. उक्त प्रकरणी अकस्मात मृत्यू क्रमांक ३२/२०१४ सीआरपीसी कलम १७४ अन्वये दाखल करण्यात आले आहे.
(४) या प्रकरणी कोणताही विलंब झालेला नाही.

---

## सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका हद्दीत असणा-या अल्पसंख्याक समाजाच्या वस्त्यासाठी महापालिकेला ६० लाखाचे अनुदान ३ वर्षापासून खर्च न झाल्याचे निदर्शनास आल्याबाबत

**(४९) १४०८६ (०७-०४-२०१५). डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका हद्दीत असणा-या अल्पसंख्याक समाजाच्या वस्त्यासाठी महापालिकेला ६० लाखाचे अनुदान ३ वर्षापासून खर्च न झाल्याचे एप्रिल २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या अल्पसंख्याक कल्याण समितीच्या धोरणानुसार महापालिका क्षेत्रात १० टक्केपेक्षा जास्त वस्त्या आहेत अशासाठी प्रतिवर्षी शासनाकडून १० लाखाचे अनुदान मिळते त्यानुसार सन २०११-१२-१३ -१४ नुसार अनुदान प्राप्त आहे, हे खरे आहे काय,
(३) तसेच या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) चौकशी अंती संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०६-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

सन २००८-०९, सन २००९-१० व सन २०११-१२ या वर्षात रु.६० लक्ष अनुदान वितरीत करण्यात आले आहे त्यापैकी रु.४४,०१,२६५/- एवढे अनुदान खर्च करण्यात आले आहे. सन २००९-१० वर्षातील रु.६,९१,७२७ इतका खर्च झाला आहे व उर्वरित रु.५,७९,७३०/- एवढ्या रकमेचे कामकाज अंतिम टप्प्यात आहे. उर्वरित विकासकामे जागे अभावी मंजूर करता आलेली नाहीत

(२) सन २०११-१२ या आर्थिक वर्षामध्ये या योजनेंतर्गत रु.२० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. सन २०१२-१३ व सन २०१३-१४ या आर्थिक वर्षामध्ये कोणतेही विकास काम मंजूर केले नसल्याने निधी देण्यात आला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मिरज (सांगली) तालुक्यातील जीवनदायी आरोग्य योजनेबाबत

**(५०) १४०९६ (०८-०५-२०१५). डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत असणा-या रुग्णालयाची देयके शासनाने तात्काळ अदा करणेबाबत लोकप्रतिनिधी मिरज यांनी मा.वित्तमंत्री व मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिनांक २८ एप्रिल, २९१४ व २२ डिसेंबर, २०१४ रोजी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिरज तालुक्यातील वॉन्लेस (मिशन) हॉस्पीटल ५९ लाख, सिध्दीविनायक कॅन्सर हॉस्पीटल १ कोटी ३४ लाख, आदित्य हॉस्पीटल ५८ लाख १४ हजार इतकी देयके देणे बाकी आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सर्व रुग्णालयाची तसेच मिरज तालुक्यातील रुग्णालयाची देयके शासन केव्हापर्यंत अदा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०६-२०१५) :**(१) होय.

(२) अंशतः खरे आहे.

मिरज तालुक्यातील रुग्णांलयाची थकबाकी पुढीप्रमाणे आहे.

वॉन्लेस हॉस्पीटलः- रु. ५१.०४ लाख

सिध्दीविनायक कॅन्सर हॉस्पीटलः- रु.७०.४१ लाख

आदित्य हॉस्पीटलः- रु.३३.२४ लाख

(३) व (४) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी जीवनदायी आरोग्य योजनेकरिता रु.३८.५० कोटी एवढीच तरतुद मंजूर होती. त्यापैकी निधी उपलब्धतेनुसार रु.३०.८० कोटी एवढी रक्कम रुग्णालयांना मंजुर करण्यात आली. त्यामध्ये वॉन्लेस (मिशन) हॉस्पीटल, सिध्दीविनायक कॅन्सर हॉस्पीटल आणि आदित्य हॉस्पीटल यांना अनुक्रमे रु.३८.५० लक्ष, रु.५४.५० लक्ष आणि रु.२४.९० लक्ष इतके अनुदान अदा करण्यात आलेले आहे.

उर्वरित प्रलंबित देयके भागविण्यासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये रक्कम प्राप्त करुन घेण्याबाबत वित्त विभागाकडे पाठपुरावा करण्यात येईल, निधी प्राप्त होताच उपलब्ध निधीच्या प्रमाणात सर्व रुग्णालयांची प्रलंबित देयके मंजुर केली जातील.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.